# आत्माराम

अनंतीच्या नाथा, कलीच्या मुक्तीदाता
तुजविण प्रबळी, कोण सोडविता
सांगे वेदवाक्यें, नीती परायणे
दुजे त्याविणे, उपाय नाही

आम्ही प्रपंची, कैसी प्रचिती
उदरार्थ प्रीती, भ्रमित झालो
काया वाचा मने, संसार जखडी
मोकळी ना होय, वासनेची बेडी

तुवा गाइले, ऐकली कवने
तुझी पुनीत, दृष्टी एकवार
आम्हा ना सोयरे, कुणी तारणाते
तुझ्या पायी येणे, होईचेना

तुझ्या चरणापाई, द्यावी ओसरी
बुद्धिभ्रम सारा, जळूनीया जाई
पावन वृत्ती, चिताठाई यावी
संगती मिळावी, भक्तीजन

तुझ्या ठायी चित्त, गोवले त्वरित
आता नवस सायास, नको आणि
नाम बोध द्यावा, या दीना करिता
तूचि सकलत्रा, तारण कर्ता

चितरूप मेदिनी, नामरूप बीज
कृपेचा घन, वर्षो आता
फलद्रुप जीवन, मुक्तीचा सागर
गुरुचरणी मिळो, आत्माराम

© सपु, www.saarthbodh.com

**– सचिन कुलकर्णी**